MHCO110001742015

सादर दिनांक : २२.०१.२०१५
नोंदणी दिनांक : २२.०१.२०१५
निकाल दिनांक : १९.०८.२०२६
कालावधी : वर्ष महिने दिवस
११ ०६ २८

# न्यायाधीश, सहकार न्यायालय सातारा यांचे न्यायालयात

**पिठासीन अधिकारी श्रीम. स्वप्नाली मेथाजी वाघमारे**

**सहकार दावा : ४०/२०१५**
**निशाणी :**

श्री. सोमाईदेवी पाणी पुरवठा वादी
सेवा सहकारी संस्था, निसरे
ता. पाटण जि. सातारा.

**विरुध्द**

१. सौ. शालन तात्यासो चव्हाण प्रतिवादी
 रा. निसरे ता. पाटण
जि. सातारा.

**दावा कर्ज रक्कम रु. २०,९६१/—**

...........................................................................................

वादी तर्फे ॲड. एस. एस. देशमुख

प्रतिवादी तर्फे ॲड व्ही. एन. भोईटै

...........................................................................................

## न्यायनिर्णय

**(दिनांक — १९.०८.२०२६)**

१. प्रस्तुत वादी यांनी प्रतिवादी म्हणजेच कर्जदार व जामीनदार यांचेकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसुल होणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

२. **वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे ...**

वादी संस्था ही महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार नोंदणीकृत झालेली संस्था आहे. सदर संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. बापूराव रामचंद्र शिंदे यांना संस्थेचे वतीने कर्ज संबंधी कामकाज पाहणेसाठी अधिकारपत्र देणेत आलेले आहे. वादी संस्थेचा व्यवसाय हा कोयना नदीतून लिफ्ट इरिगेशनद्वारे पाणी उचलून ते शेतकरी सभासदांच्या शेतीसाठी गरजेप्रमाणे पाणी पुरवठा करणे, त्याची पाणीपट्टी वसूल करणे वगैरे असा आहे. प्रतिवादी क्र. १ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. वादी संस्थेने प्रतिवादी यांच्या शेतीसाठी वेळोवेळी पाणी पुरवठा केलेला आहे. प्रतिवादी कडून वादी संस्थेला दि. १०.०९.२०१३ पर्यंत रक्कम रु. २०,४६१/— एवढी पाणीपटटी येणे बाकी आहे. सदर रक्कमेच्या मागणीकरिता वादी संस्थेने प्रतिवादी यांना दि. १०.०९.२०१३ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवली परंतु सदर नोटीस मिळाल्यानंतरही प्रतिवादी यांनी रक्कम वादी संस्थेत जमा केली

नाही. त्यांनतर दि. २४.१०.२०१३ रोजी वादी यांनी विधिज्ञांमार्फत रक्कम मागणी नोटीस पाठवली असता, सदर नोटीस मिळून देखील प्रतिवादी यांनी रक्कमेचा भरणा केलेला नाही. वादी संस्थेस प्रतिवादी यांचेकडून दि. १०.०९.२०१३ अखेर थकीत पाणीपट्टीची रक्कम व इतर खर्चासहित रक्कम रु. २०,९६१/— येणे बाकी आहे. त्यामुळे वादी यांनी रक्कम वसुलीकरिता सदर दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी ११ कडे त्यांची कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे कैफियतीमधून दाव्यातील मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी कथन करतात की, वादी संस्थेने त्यांनी पाणीपुरवठा केलेला नाही. त्यामुळे ते वादी संस्थेला रक्कम देणे लागत नाहीत. तसेच वादी यांनी पाठवलेली रक्कम मागणी नोटीस देखील चुकीच्या आशयाची असल्याचे कथन केलेले आहे. वादी यांनी दाव्यात नमूद केलेला येणे बाकी रक्कमेचा तपशील देखील चुकीचा असल्याचे कथन केलेले आहे. वादी यांची द.सा.द.शे १५ टक्के दराने रक्कम वसूलीची मागणी देखील प्रतिवादी यांना मान्य नाही. वादींनी सदर दावा केवळ राजकीय आकसापोटी व प्रतिवादींना त्रास देणेसाठी दाखल केलेला आहे असे कथन प्रतिवादींनी कैफियतीमध्ये केलेले आहे. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादींनी प्रतिवादीच्या नावाची खोटी बिले करुन सह्या घेतल्या असून ती प्रतिवादींना मान्य नाहीत. अशाप्रकारे प्रतिवादी यांनी दाव्यातील मजकूर नाकारुन दावा फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

४. दाव्याचा अभिलेख पाहिला. दोन्हीही पक्षकार यांचे विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध वाद कथनावरुन माझे माननीय

पुर्वाधिकारी यांनी नि. १२ कडे खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे—

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे प्रतिवादी यांचेकडून वैयक्तिकरित्या रक्कम रु. २०,९६१/— द.सा.द.शे १५ टक्के दराने दावा दाखल तारखेपासून वसूल होउन मिळणेस पात्र आहेत काय? | अंशत: होकारार्थी |
| २ | काय आदेश व निवाडा? | अंतिम आदेशानुसार |

५. वादीतर्फे सादर केलेल्या साक्षीदाराचे तपशील खालीलप्रमाणे—

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १ | श्री. बापूराव रामचंद्र शिंदे | १३ |

६. वादीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याचा तपशील खालीलप्रमाणे—

| अ.क्र | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १ | साक्षीदाराचे अधिकारपत्र | १६ |
| २ | वादी संस्थेचे नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रत | १४ |
| ३ | वादी यांना पाणी उचलण्याबाबत शासनाकडून मिळालेल्या परवान्याची प्रत | १५ |
| ४ | प्रतिवादी यांना वादी संस्थेमार्फत आकारणी केलेल्या पाणीपट्टी बीलाची प्रत | १७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | वादी यांनी प्रतिवादी यांना थकीत पाणीपट्टी भरण्याबाबत पाठवलेल्या नोटीसची प्रत व पोचपावती | १८, १९ |
| ६ | वादी यांनी प्रतिवादी यांना वकीलांमार्फत थकीत पाणीपट्टी भरण्याबाबत पाठवलेल्या नोटीसची प्रत व पोचपावती | २०, २१ |

७. वादी यांनी विहित कालावधीत पुढील पुरावा दाखल केला नाही.त्यामुळे दि. ०२.०८.२०२३ च्या आदेशानुसार वादी यांचा पुरावा बंद करणेत आला.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करिता**

८. वादी तर्फे दाव्याचे कथनाचे शाबिती करिता साक्षीदार नं. १ श्री. बापुराव रामचंद्र शिंदे नि. १३ यांचा पुरावा देणेत आला आहे. सदरचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात साक्षीदाराने दाव्याचे कथनाची पुनरावृत्ती केली आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ यांनी वादी संस्थेकडून पाणी घेतलेले आहे. सदर पाणी घेतलेल्या पाणी बीलाची प्रत वादी यांनी नि. १७ कडे हजर केली आहे. सदर बीलाचे अवलोकन केले असता, एकूण येणे बाकी रक्कम रु. २०, ४६१/— नमूद केली आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफियत नि. ११ कडे दिली असून त्यामध्ये त्यांनी वादीने दाव्याकामी दाखल केलेला मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांचेकडून पाणी घेतले नसल्याचे कथन केले आहे व व्याजासंबंधी

मागणी देखील नाकारलेली आहे. परंतु त्याकरिताचा कोणताही कागदोपत्री पुरावा किंवा तोंडी पुरावा प्रतिवादीने सादर केलेला नाही. वादी यांचे तोंडी पुराव्यावरुन तसेच अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरुन प्रतिवादी क्र. १ यांनी वादी संस्थेमधून पाणी घेतलेचे व त्यांनी घेतलेल्या पिकाची पाणीपट्टी न भरलेचे शाबित होते.

९. वादी तर्फे साक्षीदार श्री. बापुराव रामचंद्र शिंदे यांचा उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञ यांनी नि. १३ कडे घेतलेला आहे. सदर उलटतपासामध्ये वादीचे साक्षीदार यांनी ते वादी संस्थेमध्ये गेल्या १५ वर्षापासून सचिव म्हणून कार्यरत असून ०५ वर्षापूर्वी सेवानिवृत्त झाल्याचे कथन केले आहे. सेवानिवृत्त झालेनंतर संस्थेचे कामकाज पाहण्याचा किंवा संस्थेतर्फे जाब—जबाब देण्याचा कोणताही अधिकार किंवा अधिकृत दस्तऐवज दाव्यात दाखल नसल्याचे साक्षीदार यांनी मान्य केले आहे. साक्षीदार यांना दि. ०१.०९.२०१४ रोजीचा ठरावा दाखवणेत आला. सदर ठरावामध्ये प्रतिवादीविरुध्द न्यायालयात दावा दाखल करावा असा स्पष्ट उल्लेख नसल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रतिवादीविरुध्द दावा दाखल करणेचा ठराव दाव्यात दाखल नाही. सभासदांनी पाणी घेतल्याची नोंद असणारे रजिस्टर संस्थेत उपलब्ध असल्याचे साक्षीदाराने मान्य केले परंतु सदर रजिस्टरमधील नोंदीचा उतारा दाव्यात दाखल केला नाही. प्रतिवादी हे कोणतेही देणे लागत नाहीत व संस्थेने प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे हा प्रतिवादींच्या विधिज्ञांचा बचाव साक्षीदाराने अमान्य केला आहे.

१०. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकार संस्था कायद्यान्वये नोंदणीकृत संस्था असून संस्थेकडे पाणी उचलण्याचा अधिकृत परवाना उपलब्ध आहे. सदर परवाना वादी यांनी नि. १५ कडे सादर केलेला आहे. त्यामुळे संस्थेला सभासदांना पाणीपुरवठा करण्याचा व त्यापोटी पाणीपट्टी आकारण्याचा अधिकार आहे. वादी

संस्थेने प्रतिवादी यांच्या नावावर पाणीपट्‌टीची कायदेशीर आकारणी करुन रितसर बील दि. ३०.११.२०१२ रोजी जारी केलेले आहे. सदर देयकाबाबत प्रतिवादीने कोणतीही तक्रार किंवा आक्षेप संस्थेकडे नोंदवला नाही.

११. वादी यांचे साक्षीदार यांचे म्हणणेनुसार वादी यांनी प्रतिवादी यांना दि. दि. १०.०९.२०१३ व दि. २४.१०.२०१३ रोजी रक्कम मागणी नोटीस पाठवली होती. संस्थेने पाठवलेली दि. १०.०९.२०१३ व दि. २४.१०.२०१३ रोजीची थकीत मागणी नोटीस प्रतिवादीने स्विकारण्यास नकार दिला. सदर नकार दिलेल्या नोटीसची व पोचपावतीची प्रत वादी यांनी नि. १८ ते २१ कडे सादर केलेली आहे. कायद्यानुसार नोटीस नाकारणे म्हणजेच ती रितसर बजावली गेल्याचे मानले जाते. नोटीस मिळूनही प्रतिवादी यांनी थकबाकी भरली नाही अथवा नोटीसीला कोणतेही उत्तर दिले नाही. तसेच वादी यांनी सादर केलेल्या नि. १७ कडील बिलाचे अवलोकन केले असता, मागील बाकी रक्कम रु. १९०७६/— व चालू बिलाची रक्कम रु. १३८५/— अशी एकूण २०४६१/— रक्कम नमूद आहे. बिलाच्या तळाशी डाव्या बाजूस 'बिल मिळालेबद्‌दल सही' या मजकूरावर स्वाक्षरी असून त्यावरुन सदर बिल प्रतिवादी यांना रितसर प्राप्त झाले असलेचे निष्पन्न होते. बिलातील अटीनुसार 'काही तक्रार असल्यास बिल मिळालेपासून ८ दिवसांचे आत लेखी कळावावे नाही तर सदर बाकी बरोबर आहे असे समजले जाईल. नंतर तक्रारीचा विचार केला जाणार नाही.' असे स्पष्ट नमूद आहे. प्रतिवादी यांनी सदर बिल मिळालेपासून ८ दिवसांत कोणतीही लेखी तक्रार वा आक्षेप संस्थेकडे नोंदवला असल्याचा पुरावा दाव्यात दिलेला नाही. त्यामुळे बिलातील मागणीची रक्कम कायदेशीररित्या मान्य असल्याचे मानले जाते. सदर बिल हे केवळ चालू हंगामापुरते मर्यादित नसून त्यात मागील थकबाकी रक्कम रु. १९,०७६/— समाविष्ट असलेने

प्रतिवादीकडे संस्थेचे दिर्घकाळाचे देणे थकीत असल्याचे सिध्द होते. सबब प्रतिवादी हे वादी संस्थेस सदर रक्कम देणे लागत असल्याचे शाबित होत आहे.

१२. वादी यांचेकडून नि. १६ कडे ठरावाची प्रत हजर करुन श्री. राजेंद्र विष्णू सपकाळ यांना वादी संस्थेने पुरावा देणेचा अधिकार दिलेचे दिसते. त्यानुसार साक्षीदार नं. १ यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, वादी संस्थेला प्रतिवादी कडून रक्कम रु. २०,९६१/— येणे बाकी आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यामध्ये हजर राहून जरी त्यांचा बचाव मांडला असला तरी त्यांचे बचावाचे पुष्टर्थ त्यांनी कोणताही कागदोपत्री अगर तोंडी पुरावा दिला नसलेचे दिसते. अशा परिस्थितीत वादी संस्थेकडे प्रतिवादी क्र. १ यांनी पिकासाठी पाण्याची मागणी केली होती हे स्पष्ट दिसून येते. साक्षीदार क्र. १ यांचे कथनानुसार प्रतिवादी यांना कर्ज मागणी नोटीस पाठवली होती. सदर नोटीस चुकीची असल्याचे कथन प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये केलेला आहे. परंतु त्याकरिताचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१३. वादी यांनी सादर केलेल्या नि. १७ कडील पाणी पट्टीच्या बिलाचे अवलोकन केले असता, त्यावर पाणीपट्टीच्या थकबाकीवर १८ टक्के व्याजदर आकारला जाईल असा मजकूर नमूद आहे. परंतु वादी यांनी दाव्यामध्ये थकबाकी रक्कमेवर १५ टक्के व्याज दर मिळणेची विनंती केली आहे. त्यामुळे रक्कम रु. २०,४६१/— करिता द.सा.द.शे १५ टकके व्याज मंजूर करणे न्यायउचित ठरेल. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ हे रक्कम रु. २०,४६१/— यावर दिनांक. २२.०१.२०१५ पासून द.सा.द.शे १५ टक्के व्याज देणे लागतात हे शाबित होते. अभिलेखावरुन तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे आधारे प्रतिवादी क्र. १ यांचेकडून

द.सा.द.शे १५ टक्के व्याज दराने थकीत कर्ज रक्कम वसूल करणेबाबतचा अधिकार वादीचा असलेचे शाबित झाले आहे. सबब मी मुद्दा क्र. १ करिता अंशतः होकारार्थी उत्तर नोंदवून मुद्दा क्र. २ करिता खालील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. दावा अंशतः मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी कर्जाची रक्कम रु. २०,४६१/— (अक्षरी — वीस हजार चारशे एकसष्ट रुपये फकत) वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीला परत करावेत.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी थकीत कर्ज रक्कमेवर दिनांक २२.०१.२०१५ पासून द.सा.द.शे १५ टकके व्याजदराने ते रक्कम वसूल होईपर्यंत होणारी रक्कम परत करावी.

४. दाव्याचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी आपापला सोसावा.

५. येणेप्रमाणे निवाडा करणेत यावा.

खुला न्यायालयात सदर निकाल घोषित करणेत आला.

WAGHAMARE SWAPNALI METHAJI

Digitally signed by WAGHAMARE SWAPNALI METHAJI
Date: 2026.08.20 16:15:30 +0530

ठिकाण — सातारा

दिनांक — १९.०८.२०२६

**श्रीम. एस. एम. वाघमारे**
**न्यायाधीश**
**सहकार न्यायालय, सातारा.**